ॐ

# अध्याय सतरावा

१ अर्जुन बोले, ‘जयां न च कळे शास्त्र-विधीची खूण
आस्थापूर्वक परि जे यजिती भोळा भाव धरून १
तयां लाभते गती कोणती त्यांची निष्ठा कैसी ?
सात्त्विक राजस किंवा तामस तें सांगावें मजसी.’ २

२ अनिरुद्ध म्हणे,‘त्रि-विध श्रद्धा स्वाभाविक जीवांची
ऐक सात्त्विकी आणि राजसी तशी तामसी साची ३
नर एखादा श्रद्धा केवल धरुनी परम-पदातें
साधायातें पाहे तरि तें नोहे सुलभ तयातें ! ४

३ स्वभाव ज्याचा जसा तयाची श्रद्धा हि तशी मानीं
श्रद्धा धरितो तसा चि होतो श्रद्धा-मय हा प्राणी ५

४ तामस जन ते पूजिती इथे प्रेतें हि भुतें-खेतें
यक्ष-साक्षसां राजस यजिती सात्त्विक ते देवातें ६

अंतःकरणीं जरि सत्त्व-गुणी उदय पावली श्रद्धा
आणि लाभली स्वर्ग-संपदा तरि ती कारण बंधा ७

तिथे न धांवे परि स्वभावें झोंबे जी ब्रह्म-पदा
जाण आगळी सर्वथा भली 'शुद्ध सात्त्विक' श्रद्धा ८

ज्ञाते बरवे मूर्तिमंत जे श्रुति-स्मृतींचे अर्थ
आणि जयांनीं स्वानुभव-बळें आकळिला परमार्थ ९

पारंगत जे असे तयांतें भावें जातां शरण
असो नेणता तरि पंडु-सुता, जाई तो हि तरून १०

५ जे मंद-मती तप आचरिती भीषण-शास्त्र निषिद्ध
ठेवुनि पोटीं कामासक्ती दंभाहंकृति-बद्ध ११

६ मज आत्म्यातें शिणविती इथे देह-धातु शोषुनियां
जाण तयांची निष्ठा साची आसुरी चि ती विजया १२

रज-तमोगुणी म्हणुनी तीतें दूर सांडुनी जावें
आणि सर्वथा सात्त्विक निष्ठा जतन करावी भावें ! १३

७ असे हि सर्व प्राणि-गणातें प्रिय आहार त्रि-विध
यज्ञीं दानीं तपीं तसे ते ऐक सांगतों भेद. १४

८ सुख सात्त्विकता रुची बल तथा आयुष्य हि वाढवितें
आरोग्य-प्रद असें अन्न तें सात्त्विकांसि आवडतें १५

जीवन-रस-परिपोषक देतें चित्ता जें संतोष
स्निग्ध रसाळ स्थिर मधुर असें तें सात्त्विक निर्दोष १६

९ अम्ल तिखट जें क्षार कोरडें झणझणीत अत्युष्ण
आणि विदाही तें प्रिय होई राजस लोकां अन्न १७
जिह्वा-लौल्यें अन्न-मिषें ते आग चि भरिती पोटीं
देहीं नाना व्याधी जडतां होती दुःखी कष्टी १८
१० रस-हीन शिळें बहुत निवालें दुर्गंधित उच्छिष्ट
तसें अमंगळ अन्न गमे तें तामस लोकां इष्ट १९
पुरें आंबलें आणि बुरसलें अर्धें-कच्चें शिजलें
रुचे तामसां तें चि करपलें तसें कश्मळें भरलें २०
जसा जयाचा आहार असे तशी तयाची बुद्धि
म्हणुनी सात्त्विक अन्न सेवुनी साधीं अंतःशुद्धि २१
११ जो शांत-मनें निष्काम-पणें कर्तव्य चि तें म्हणुनी
यजिला जातो यज्ञ विधीनें तो 'सात्त्विक' तूं मानीं २२
१२ नाना यज्ञ-क्रिया करुनियां भोग-सुखें भोगावीं
इह-पर-लोकीं सर्वथा अशी धरुनी आशा जीवीं २३
तेविं भारता, मान-मान्यता त्रि-भुवनांत लाभावी
म्हणुनी यजितां त्या यज्ञातें 'राजस' ऐसी पदवी २४
१३ मंत्र-हीन विधि-हीन यज्ञ जो ज्यांत न अन्नोत्पत्ति
नसे त्याग ना श्रद्धा जेथें त्यातें 'तामस' म्हणती २५
१४ देव-द्विज-गुरु-पंडित-पूजा तशी स्वच्छता ऋजुता
आणि अहिंसा ब्रह्मचर्य तें तप 'देहाचें' पार्था २६

१५ खुपे न च कुणा भाषण ऐसें सत्य प्रिय हितकारी
वेदाध्यन स्तोत्र-पठन तें 'वाचिक' तप अवधारीं २७

१६ निवाऱ्यांतला जसा स्वभावें तेवे दीप निवांत
तशी चि चित्त-वृत्ति ठेवणें प्रसन्न आणिक शांत २८

निरभ्र गगनीं विमल चंद्रिका जशी पूर्ण-चंद्राची
तशी राखणें सहज-सौम्यता सदा अंतरंगाची २९

सहज थांबवी निज गुंजारव जसा भ्रमर मधु-पानीं
आत्मातुभवीं तसें राहणें संतत मौन धरोनी ३०

आणि भावना शुद्ध राखणें मनःसंयमन करुनी
जाण भारता, तें चि बोलती 'मानसिक' तप ज्ञानी ३१

१७ कायिक वाचिक मानसिक असें तप त्रि-विध हें करिती
योगी-जन ते फलाभिलाषा न च बाळगुनी चित्तीं ३२

तेविं जें दृढ श्रद्धा धरुनी तप आचरिलें जातें
जाण अर्जुना, म्हणती त्यातें 'सात्त्विक' ऐसें ज्ञातें ३३

१८ मान मिळावा जगांत व्हावा आपुला चि सत्कार
पूजेलागीं दुजा नच जगीं असा दंभ अनिवार ३४

धरुनी पोटीं तप आचरिती जें अस्थिर चंचलसें
जाण किरीटी, तें चि बोलती जगतीं 'राजस' ऐसें ३५

१९ दुराग्रहें जें तप आचरिलें शिणवुनियां आत्म्यातें
अथवा जें पर-घात इच्छुनी 'तामस' म्हणती त्यातें ३६

२० स्वधर्म-भावें निष्कामत्वें दान सुपात्रीं दिधलें
जें उचित स्थळ काळ पाहुनी तें ‘सात्त्विक’ सांगितलें ३७

२१ परंतु केल्या उपकाराची फेड इच्छुनी कष्टें
फलाभिलाषा धरुनी दिधलें दान जाण ‘राजस’ तें ३८

२२ अनुचित स्थळीं अविहित काळीं अपात्रीं दिलें दान
जें अनादरें तुच्छता-भरें तें ‘तामस’ तूं जाण ३९

रज-तम जातां तिजें तत्त्वतां उरे भारता, सत्त्व
तें सर्वस्वीं अंगिं बाणवीं लक्षुनि मोक्ष-महत्त्व ४०

ती सात्त्विकता अंगिं बाणतां सत्त्वाचाही बंध
तुटुनी जाई साधक होई त्रि-गुणातीत अबंध ४१

अशी किरीटी, तुज हातवटी अतां दावितों जाण
जेणेंकरुनी पावशील तूं पद ब्रह्म-निर्वाण ४२

२३ पर-ब्रह्म जें अनादि सहजें अनाम तें परिपूर्ण
परी अविद्या-रात्रीमाजीं ओळखावया खूण ४३

जी सांगितली असे तिहेरी ‘ॐ तत्सत्’ ह्या नांवें
तेणें शिणला जीव पावतो विश्रांती निज-भावें ! ४४

‘ॐ तत्सत्’ निर्देशद्वारा प्रजापतीनें सृजिले
सृष्ट्यारंभीं ब्राह्मण तैसे वेद यज्ञ ते सगळे ४५

सृष्टीपूर्वीं तो प्रजा-पति असे एकला कष्टी
परमेशातें मज न ओळखे रचूं नच शके सृष्टी ४६

तदा अंतरीं मातें स्मरुनी करितां नामोच्चार
तो उठाउठीं समर्थ सृष्टी रचावया साचार ! ४७

असें थोर हें नाम लक्षुनी करीं सदा सत्कर्म
ऐक भारता, अतां तयांच्या विनियोगाचें वर्म ४८

सत्कर्म करी नर उच्चारी ब्रह्म-नाम हें वाचे
तरी विफल तें सर्व नेणतां रहस्य विनियोगाचें ४९

म्हणुनी साचा ॐकाराचा विनियोग इथे प्रथम
तुज दाखवितों सहज करी तो मोक्ष-मार्ग अति सुगम ५०

२४ ब्रह्म-ज्ञानी ब्रह्म चिंतुनी करुनी प्रणवोच्चार
मग अनुष्ठिती यज्ञ-दान-तप विधानोक्त साचार ५१

तूं हि अर्जुना, ध्यानें करुनी गोचर तो ॐकार
नामोच्चारें स्वकर्म सारें करीं चि विध्यनुसार ५२

मातें स्मरुनी नाम लक्षुनी तसें आदिमध्यान्तीं
कर्में करितां सहजें पार्था, नच तीं बंधक होती ५३

२५ कर्में हि भलीं तरीं न च फलीं आस ठेवुनी करणें
‘तत्’काराचा विनियोग असा ध्यानीं घे पूर्णपणें ५४

मोक्ष-काम ते ‘तद्’ ब्रह्मातें स्मरुनि यज्ञ तप दान
मग अनुष्ठिती आणि ठेविती ‘न मम’ भावना पूर्ण ५५

कर्म ब्रह्माकार जाहलें तरी उरे जो कर्ता
तो हि तत्त्वतां ब्रह्म-रूपता पावतां चि सार्थकता ५६

२६ गिळुनी कर्ता कर्म आघवें 'मद्रूप' चि तें होणें
'सत्' काराचा अंतरंग हा विनियोग असा जाणें ५७
'सत्' कारें सौंदर्य लाभतें येथें सत्कर्मातें
प्रयोजितां 'सत्' शब्द साधुता सकल हि कर्मां येते ५८

२७ यज्ञ दान तप सर्व हि होतें 'सत्' कारीं परिपूर्ण
ब्रह्मार्पण जें कर्म अर्जुना, त्यांत न राहे न्यून ५९
यज्ञीं दानीं तपीं भावना संतत सुस्थिर असणें
आणि सर्वथा 'तदर्थ' जें जें तें 'सद्रूप' चि जाणें ६०
ॐ तत्सत् हा असे जयाचा पहा मूळ संकल्प
जाणुनि त्याचें रहस्य साचें तूं होईं निष्पाप ६१
संतत मातें परमात्म्यातें स्मरुनी मत्प्रीत्यर्थ
त्यजुनि अहंता सत्कर्म चि तें करीं असा इत्यर्थ ! ६२

२८ अश्रद्धेनें दिधलीं दानें यज्ञ-तपें आचरिलीं
'असत्' बोलिलीं इह-परलोकीं तशीं विफल तीं सगळीं. ६३

असा सप्तदशाध्यायीं श्रद्धा-त्रय-विभाग हा ।
येथें भावार्थ गीतेंत सविस्तर निवेदिला ॥ १७॥